# परिवर्तनाच्या यशोगाथा

## जिल्हा अकोला, महाराष्ट्र



Supported by

Maharashtra Village Social Transformation Foundation

An Initiative of the People of Maharashtra

Published by

YUVA (Youth for Unity and Voluntary Action)

YUVA Centre, Sector 7, Plot 23, Kharghar

Navi Mumbau – 410210 (INDIA)

## ABOUT THE BOOK

Across different parts of Maharashtra state, there is wide disparity in the human development index (HD[1] ), indicating levels of poverty and unequal access to adequate habitats, education and health facilities, basic services and infrastructure, etc. In the Vidarbha region especially, given the multiple levels of deprivation, farmer lives and livelihoods have often been in distress. Youth for Unity and Voluntary Action (YUVA), a non-profit development organisation, has been working with farmers in this region since 2002 towards their empowerment and development.

In the pages that follow, we offer you a brief glimpse of our integrated people-led approach to change in Akola district, Barshitakli taluka, as one of the implementation partners of the Maharashtra Government's Village Social Transformation Mission since January 2018. With people's empowerment and support for sustainable agriculture, additional livelihood opportunities, soil and water conservation and more, we vision the growth of resilient rural spaces that can offer the promise of better futures.

## प्रस्तावना

महाराष्ट्र राज्याच्या विविध भागातील मानवी विकास निर्देशांकात बरीच असमानता आढळते, ही असमानता दारिद्र्य रेषेतील तफावत, आधिवास, शिक्षण, आरोग्य सुविधा, मूलभूत सेवा आणि पायाभूत सुविधा इत्यादींचे असमान स्थिती दर्शवते. विशेषतः विदर्भात जिथे मूलभूत संसाधनांचा अभाव आहे, तिथे शेतकऱ्यांचे जीवन आणि उपजीविका नेहमीच संकटात असते.

युवा सामाजिक संस्था विदर्भ विभागामध्ये शेतकरी व् इतर घटकांसोबत त्यांच्या सशक्तिकरनासाठी आणि विकासासाठी गेली दहा वर्षे कार्यरत आहे.

या पुस्तकातला मजकूर वाचकांना आमच्या लोकांच्या नेतृत्वातून घडवलेल्या बदलाची एक झलक दाखवण्याचा प्रयत्न आहे. लोकांच्या सशक्तीकरणातून आणि शाश्वत शेती, इतर जोड़धंदे व् उपजिविकांच्या संधी, माती आणि पाण्याचे संवर्धन अशा विवीध उपक्रमांना दिलेल्या समर्थनामुळे आम्ही सध्याच्या बदलत्या ग्रामीण विभागाच्या उज्ज्वल भविष्याचे ध्येय आखू शकलो.

[1] https://timesofindia.indiatimes.com/city/nagpur/second-in-per-capita-income-maha-lags-behind-in-major-basic-human-development-indicators/articleshow/61798204.cms

# अनुक्रमणिका


- शाश्वत शेती पद्धती
- जल व् मृद संधारण
- मूलभूत सेवा आणि पायाभूत सुविधा
- वैकल्पिक आणि पूरक जीवनाधारग्रामीण आवास
- समुदाय सशक्तीकरण.
- लोकांचा सहभाग आणि बद्लाच्या प्रक्रियेमधील पुढाकार
- स्वस्त व स्वच्छ ऊर्जा
- पर्यावरण आणि जैवविविधता

## VSTF ACTION PLAN IMPLIMENTATION PROCESS AND STATUS

159 task was identified in each village related to VSTF indicators and sub indicators.

Total 3498 task was plan among 22 Project villages







**Implementation Status As on 15th August**

Plan Task - 3498 Task Done - 2964




# शाश्वत शेती आणी जीवनधार

शाश्वत शेतीचा अवलंब केल्याने रासायनिक खते किटकनाशके व तणनाशके इत्यादींचा वापर कमी करून अन्नधान्याचा दर्जा वाढविण्यास मदत होत आहे. याबरोबर उत्पादन खर्चही प्रती एकरी 2 ते 3 हजार रूपयांनी कमी होत आहे. मला या प्रकल्पाच्या माध्यमातुन शाश्वत शेती करण्याकरिता निविष्ठा सुध्दा प्राप्त झाल्यात. सर्वात महत्वाचे म्हणजे जमिन भुसभुशित होवुन जिवाणुंची संख्या वाढली.

| अ.क्र | एकुण सहभागी शेतकरी संख्या | एकुण क्षेत्रफळ (एकर) |
| --- | --- | --- |
| 1 | 841 | 839.5 |



# भाजीपाला लागवड

प्रकल्पामुळे आम्ही गावकऱ्यांनी पिक परिवर्तन करून भाजीपाला लागवड केली पुर्वी आम्ही पारंपारिक पिके घेत असतांना पिकाचा कालावधी हा 90 ते 120 दिवसांचा असायचा व त्यामागे लागत खर्च जास्त व निव्वळ नफ्याचे प्रमाण कमी होते, आता भाजीपाला पीके घेत असल्यामुळे तेवढ्याच क्षेत्रामध्ये निव्वळ नफा जास्त मिळत आहे. आठवड्याला भाजीपाला विर्क्री मधुन पैसे मिळत आहेत. त्यामुळे परिस्थितीत बदत घडुन आला. व आज आम्ही समाधानाने शेती करित आहोत.





# भाजीपाला लागवड तपशील

| अ.क्र | एकुण सहभागी शेतकरी संख्या | एकुण क्षेत्रफळ (हेक्टर) | घेतलेली पिके |
|---|---|---|---|
| 1 | 107 | 54.31 | बरबटी,कारले,दोडके पालक,मेथी,कांदा,टोमॅटो, वांगी,गोबी,मिरची,चवळी, गवार,संभार इत्यादी |







# मसाला वार्गिय पिके

गावामध्ये प्रकल्प येण्यापुर्वी मी पारंपारिक पध्दतीने पीके घेत होतो. महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन अभियाना अंतर्गत युवा संस्थे व्दारे मसाला वर्गीय पीक – हळद बाबत प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले. त्यामुळे मी 1 हेक्टर क्षेत्रावर हळद पीक घेतले. त्यामधुन मला 160000 रूपये निव्वळ नफा मिळाला. पुर्वीच्या तुलनेमध्ये निव्वळ नफ्यामध्ये 80000 रूपयांनी वाढ झाली.

शेतकऱ्यांचे नाव : सदाशिव गंगाराम शिंदे,
गाव : चोहोगाव

# हळद लागवड तपशील

| एकुण सहभागी शेतकरी संख्या | एकुण क्षेत्रफळ (हेक्टर) | एकुण लागत खर्च (रूपये) | एकुण वितरित अनुदान (रूपये) | खर्च वजा निव्वळ नफा (रूपये) |
|---|---|---|---|---|
| 60 | 39.38 | 5782909 | 374110 | 6349091 |





# तूती लागवड

प्रकल्पाच्या मार्गदर्शनामुळे शेतीस पुरक जोड धंदा म्हणुन रेशीम व्यवसाय सुरू करावयाचा आहे. त्याकरिता 2 एकर शेती मध्ये तुती लागवड केली.

शेतकऱ्यांचे नाव : ज्ञानदेवराव बहादरे | गाव : वरखेड

# कृषि उपयोगी अवजार बँक

Sparc unit - Small Product Agricultural Resource Center






# श्री गुप्तेश्वर महिला बचत गट, वाघा

VSTF व युवा संस्थेच्या पुढाकाराने कृषी समृध्दी प्रकल्पामधुन आम्ही 291200 रूपयांचे मळणी यंत्र खरेदी केले, 2018 च्या खरीप व रब्बी हंगामामध्ये आमच्या गटाला 115000 रूपये निव्वळ नफा मिळाला. तसेच 116480 रूपयांचे अनुदान कृषी समृध्दी प्रकल्पामधुन मिळाले. आता आम्हाला बाहेर गावी स्थांलातर करावे लागत नसुन गावामध्येच रोजगार मिळत आहे. तसेच आर्थिक गरजा पुर्ण होवु लागल्यामुळे कुटूंबात आनंदाचे वातारवण आहे.





# शेतीस संरक्षण तार कुंपण



आमचे गाव काटेपुर्णा अभयारन्याला लागुन असल्यामुळे जंगली जनावरांपासुन शेत पिकांचे खुप मोठ्या प्रमाणात नुकसान होत असे परंतु प्रकल्पाच्या सहकार्यामुळे आमच्या शेतास तार कुंपन पुर्ण झाले व 15 ते 20 टक्के पिकांचे होणारे नुकसान थांबले. आता आम्हाला रोज रात्री अंधारामध्ये शेत राखणीकरीता जाण्याची गरज नाही.

शेतकऱ्यांचे नाव : निलेश भुसारी , देवदरी



# नाला खोलिकरण व रुंदीकरण

ओढा, नाल्यांच रूंदीकरण किंवा खोलीकरण करतांना अनेक गोष्टींचा विचार करून अतिशय शास्त्रशुध्द पद्धतीनी करांव लगात. सदर गावातील स्थानीक लोकांना नाला खोलीकरण व रूंदीकरणामुळे सिंचन विहिरी व गावातील पाण्याची पातळी वाढली. याचाच फायदा परिसरातील शेतीसाठी होत आहे.



# सीमेंट नालाबंध

सिमेंट नालाबांध झाल्यामुळे शेतातील वाहुन जाणारे पाणी अडवले गेले त्यामुळे आमच्या विहीरीची पाण्याची पातळीत वाढ झाली पर्यायाने आम्ही शेतामध्ये भाजीपाल्याचे पिक घेवु शकत आहे..



# सलग समतल चर

सी.सी.टी.

छोटी सी.सी.टी म्हणजे सलग समचर चर 0 ते 33 टक्के पर्यंतच्या उतारावर अतिशय तंत्रशुध्द पध्दतींन तयार केले जातात. छोट्या सी.सी.टी. मुळे डोंगर उतारावरून वाहुन जाणारं पाणी आडवलं जात आणि मुरवलं तर जमीनीची धुपही थांबते. 30 मीटर लांब ,60 सेमी रूंद आणि 30 सेमी खोल असलेला एक चर साधारण दहा पावसात 54 हजार लीटर पाणी साठवतो, म्हणजे दहा हजार लीटरचे साडे पाच टॅंकर पाणी अडवल जाते.

डिप सी.सी.टी.

डिप सी.सी.टी. 0 ते 8 टक्के उतार असलेल्या ठिकाणी तंत्रशुध्द पध्दतीन तयार करतात.डोंगर माथ्यावर डोंगराच्या मध्यभागी उतार नसलेली सपाट जागा असल्यास आणि डोंगराच्या पायथ्यांशी उतार संपल्यावर हा उपचार केला जातो. छोटी सी.सी.टी भरून वाहील्यानंतर वाहुन जाणारं पाणी डिप सी.सी.टी. मध्ये मुरतं आणि जमीनीची धुपही थांबते.





पावसाचे पाणी आपल्या सोबत मोठ्या प्रमाणाात शेतातील सुपीक गाळही वाहुन नेते, शेतातली माती गाळ वाहुन जाऊ नये आणि शेतातल पाणी शेतात मुरावं यासाठी सर्वोत्तम उपाय म्हणजे शेता भोवती केलेली बांध बंदिस्ती किंवा ढाळीचे बांध जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत गावागावांमध्ये मोठ्या प्रमाणात बांध बंदिस्तीचे काम सुरू आहे. बांध बंदिस्तीमुळे सुपीक माती वाहुन जात नाही. जमिनीतली पाण्याची पातळी झपाट्यानं वाढते बांध बंदिस्तीमुळे पिकात मोठा फरक पडुन शेतकऱ्याला मोठा फायदा झाला.



# जल व् मृद संधारण
# इतर उपचार

लोकसहभागातुन दगडांचा वापर करून
तयार केलेले गॅबियन बंधारा



गाव तलावामधील गाळ काढुन पाणी
साठ्यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली.



# ठिबक तुषार सिंचन

पाणीसाठा नियोजन करण्यासाठी ठिबक आणि तुषार संच वापरासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहीत केलं गेल. ज्यामुळे पाण्याची मोठ्या प्रमाणात बचत होवुन कमी पाण्यामध्ये जास्त पीक घेता आल







# शेत तळे

शासन अनुदान असणारं शेततळ हे देखील गावा गावातली पिक परिस्थिती बदलवण्यासाठी फार उपयोगी ठरलं. शेततळे झाल्यामुळे शेतकरी वेळेवर पाऊस न आल्यास संरक्षित ओलित करित आहेत.



## मूलभूत सेवा आणि पायाभूत सुविधा



# गुणवत्ता पूर्ण शिक्षण डिजिटल शाळा

शिक्षणाच्या दर्जात सुधारणा घडवणारी व विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाच्या पलीकडे नवीन माहिती देणारी ही आनंददायी शिक्षणपध्दती आहे. या प्रणालीचा फायदा म्हणजे यामध्ये विद्यार्थ्यांची उपस्थिती टिकुन राहते, विद्यार्थ्यांची गळतीचे प्रमाण कमी होते,खडु फळा विरहित ओझ्याविना शिक्षणाकडे वाटचाल घोकमपट्टीतुन मुलांची सुटका होते. प्रकल्प क्षेत्रामधील 21 शाळांची डिजीटल क्लासरूम कडे वाटचाल.





# सामजिक वर्तणुक बदल स्वछता

सार्वजनीक कचरा कुंडी
वैयक्तीक शौच्छालय
शौच्छ खड्डे







भुमिगत गटार



शौच्छ खड्डे





# शाळा आंगणवाडी इमारत दुरुस्ती

VSTF प्रकल्पामधील गावामध्ये शिकस्त वर्ग खोली व अंगणवाडी ग्रामकोष व 14 वित्त आयोग निधीमधुन दुरुस्ती व रंगरंगोटी, फर्निचर,खेळणी इत्यादी कामे करण्यात आलीत.




## आरोग्य

गरोदर मातांना अंगणवाडीमध्ये नाव नोंदणी करून लसीकरण, औषध उपचार व पोषण आहार नियमित पणे सुरू गावामध्ये विविध आरोग्य शिबिराचे आयोजन. गर्भवती महिलांना विविध लोहयुक्त गोळ्या पुरवल्या जातात.

# मासिक पाळी व्यवस्थापन प्रशिक्षण

मासिक पाळी संदर्भात आज ही ग्रामीण भागामध्ये मोठ्या प्रमाणात अंधश्रध्दा आहेत. माझी पहीली पाळी, मासिक पाळी चक्र, पाळी येणाच्या आधी होणारा मनस्ताप, व विविध गैर समजुती या बाबत जाणिव जागृती करण्यात आली.





# घरकुल

हक्काचे घर नव्हते, पक्के घर नसल्याने झोपडीत राहायचो, प्रधान मंत्री आवास योजनेमधुन पक्के घरकुल मिळाले. सुरक्षित निवारा मिळाला.

लाभार्थी : रेवासिंग गुलाब राठोड

मा.धनंजय माळी साहेब चीफ ऑपरेटींग ऑफिसर VSTF
फित कापुन घरकूल अनावरण प्रसंगी



VSTF गाव विकास आराखड्या नुसार
ग्रामिण आवास एकुण लक्ष व साध्य



# सार्वजनिक रोड सुविधा

## जोड़ रस्ते

सदर गावामध्ये धाबा ते जामवसु रोड चे काम झाल्यामुळे गावातील विद्यार्थ्यांना शाळेमध्ये जाण्यासाठी ऑटोरिक्षा गावामध्ये चालु झाले शेतकऱ्यांना शेतातील माल विकण्यासाठी थेट मार्केट मध्ये गाडी भाड्याने करून नेता येते. पर्यायी गावकऱ्यांचा वेळ वाचला आहे.





# अंतर्गत रस्ते

सदर गावामध्ये प्रकल्पाच्या सुरूवातीला गावामध्ये रस्त्यांच्याची दुरावस्था होती. मोठ्या प्रमाणात गावातील सांडपाणी रस्त्यांवर आयचे त्यामुळे घाणीचे साम्राज्य झाले होते. गावातील अंतर्गत रस्ते झाल्यामुळे गाव स्वच्छ दिसु लागले.





# सामाजिक सभागृह

सभागृह दुरूस्ती व रंगरंगोटी केल्यामुळे अतिशय आकर्षक दिसत आहे.
त्यामुळे गावकऱ्यांचे तसेच गावात येणाऱ्या पाहुण्याचे मोक्याचे ठिकाण हे सभागृह आहे.
गावामधील सार्वजनीक कार्यक्रम, उत्सव विविध बैठकां करीता
गावामध्ये महत्वाचे संसाधन केंद्र निर्माण.







# सिंचन विहीर

मनरेगा अंतर्गत सिंचन विहिरीचे काम गावात झाले त्यामुळे गावात चांगला पाणीसाठा निर्माण झाला कोरडवाहु शेती बागायती झाली पुर्वी वर्ष भरामध्ये एकच पिक घ्यायचो आता मात्र रब्बी हंगामामध्ये सुध्दा पिक घेत आहोत. पाण्याची व्यवस्था निर्माण झाल्यामुळे उत्पन्नात दुपटीने वाढ झाली.



जनावरांसाठी पिण्याच्या पाण्याची
व्यवस्था – हौद बांधकाम





# पाणी स्वछता

स्वच्छ व सुरक्षीत पाणी पुरवठा
प्रकल्प क्षेत्रामधील 4 गावांमध्ये तीव्र पाणी टंचाई होती प्रकल्पाच्या माध्यमातुन या गावांमध्ये विहिर, पाईप लाईन,सार्वजनिक नळ व्यवस्था, इत्यादी स्वरूपाची कामे यशस्वी रित्या पुर्ण. 11 गावांमध्ये क्षारयुक्त पाणी व दुषीत पाण्याची समस्या प्रकर्षाने जाणवायची यामधुन काही गावांमध्ये किडनी आजार सुध्दा बळावला, स्वच्छ व सुरक्षीत पाणी पुरवठा करण्याच्या हेतुने 11 गावांमध्ये गावस्तरिय पाणी शुध्दीकरण सयंत्र कार्यान्वयीत.












PLASTO



# पशुधन विकास व मत्स्य व्यवसाय

दुग्ध व्यवसाय प्रकल्पामुळे आम्ही गटांच्या माध्यमातुन जोडधंदा म्हणुन दुग्ध व्यवसाय सुरू केला. आमच्या गटाने एकुण 12 दुधाळ जनावरे – .म्हशी खरेदी केल्यात प्रती सदस्य दोन म्हशी, दररोज एकुण 20 लिटर दुध उत्पादन व विक्रीमधुन 700 रूपये मिळत असुन दररोज खर्च वजा जाता 300 रूपये निव्वळ नफा, यामुळे आमच्या कुटूंबाचे मासिक उत्पन्न 9000 रूपयांनी वाढले. तसेच शेण खत उपलब्ध झाल्यामुळे रासायनिक खतावरिल खर्च कमी झालाृ


शेळी पालन


जानवर लसीकरण मोहिम




मत्स्य व्यवसाय

समुदाय सशक्तीकरण



# महिला व बाल विकास

महिला बचत गट निर्मिती व सक्षमीकरण
गावामध्ये कोणत्याच प्रकारचा महिला बचत गट नव्हता आमचे गाव महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन अभियाना मध्ये आल्यामुळे गावामध्ये डैत्स्डएटैज्थ व युवा यांच्या सयुक्त प्रयत्नामधुन जनजागृती करून गावातील महिलांना एकत्रीत आणले व 180 नविन महिला बचत गट निर्मिती.












# गटांच्या माध्यमातुन उद्योग निर्मिती

आम्हाला पुर्वी मजुरी करण्याकरिता बाहेर गावी जावे लागत असे. ग्रामप्रेरक याच्या मदतीने गावामध्ये बचत गटांच्या माध्यमातुन विविध उद्योग, व्यवसाय त्यामध्ये गोळंबी उद्योग, शेळी पालन, स्पार्क युनिट, शिलाई मशिन इत्यादी युनिट सुरू झालेत ज्यामुळे आर्थिक उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण होवून कुटूंबास हातभार लागला. व महत्वाचे म्हणजे आम्ही महीला आर्थिक बाजुंने सक्षम झालोत.



# शालेय व्यस्थापन समिती

विविध बैठका, जाणिव जागृती च्या माध्यमातुन शाळा व्यवस्थापन समिती सक्रिय झाल्यात त्यामधुन शाळा बाह्य मुलांच्या घरी भेटी देणे, गुणवत्ता वाढीबा. बत चर्चा करणे तसेच शाळेमधील मुलभूत सोई सुविधा उदा.इमारत दुरूस्ती, पाणी, स्वच्छता गृहाचे व्यवस्थापन व देखरेख इत्यादी बाबी समितीच्या माध्यमातुन होत आहेत.



# मोटर चालक प्रशिक्षण

4 चाकी मोटर चालक प्रशिक्षण घेण्याकरिता आम्हाला ग्राम प्रेरक यांनी मार्गदर्शन करून आमचे फार्म भरून घेतले आणि मोटर शिकण्याकरिता प्रशिक्षणाचे आयोजन केले. 100 दिवसाचे, ˙600 तासाचे प्रंशिक्षण आम्ही यशस्वीरित्या पुर्ण केले. व आज आम्हाला मासिक 8 हजार रूपयांचे काम मिळाले. आम्ही पहिले कधी चार चाकी मोटार चालवली नव्हती प्रकल्पाच्या माध्यमातुन वरखेड देवदरी गावामधील 07 युवकांना चारचाकी मोटार प्रशिक्षण मिळाले त्याकरिता आम्ही त्यांचे आभारी आहे.




# लोकांचा सहभाग आणि बदलांच्या प्रक्रियेमाधिल पुढाकार

ग्रामसभा
श्रमदान





# स्वच्छ व सुरक्षित उर्जा



## स्वस्त व स्वच्छ उर्जा

सोलर पथ दिवे

सदर गाव हे जंगलाला लागुन असल्यामुळे जंगली प्राण्याची येजा असायची त्यामुळे वन्यजीवाचा धोका होता त्यासाठी पथ दिव्यांची आवश्यकता होती, गावातील झोपडपट्टी,नविन वस्ती तसेच गावातील इतर ठिकाणी सोलर पथ दिवे बसविण्यात आले.



गॅस शेगडी

पुर्वी चुलीवर स्वयंपाक करायचे, वेळ, श्रम, खर्च व्हायचा तसेच महत्वाचे म्हणजे सर्व घरामध्ये धुरच धुर व्हायचा ज्याचा आरोग्यावर सुध्दा परिणाम व्हायचा आता धुरमुक्त झाल्यामुळे स्वंयपाक करण्यामध्ये आंनद मिळतो.

लाभार्थ्यांचे नाव : निर्मला विलास खुळे







मा. धनंजय माळी साहेब चीफ ऑपरेटींग ऑफिसर VSTF वृक्ष लागवड करताना



# पर्यावरण व जैवविविधता / वन समिती

जैवविविधता व वन समिती – 13
वृक्ष लागवड 2019–20
105854 समित्यांचे सक्षमीकरण करून स्थानिक संसाधनाचे मोजमाप प्रक्रियाधिन, वृक्ष तोड थांबली.

# VSTF DPR च्या अंमल बजावणीची सद्यस्थिती

| अ. क्र | विकासक्षेत्र व क्रियाकलाप | लक्ष 2018–19 व 2019–20 | | | साध्य 2018–19 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | भौतिक लक्ष हेक्टर/संख्या | आर्थिक लक्ष | | भौतिक साध्य हेक्टर/संख्या | आर्थिक साध्य | |
| | | | ग्राम कोष निधि | समन्वयित विभाग निधि | | ग्राम कोष निधि | समन्वयित विभाग निधि |
| | शेती | | | | | | |
| १ | फळबाग,भाजीपाला व मसाला पीके लागवड | 118 | ० | ४२३२७५० | 93.69 | ० | ९३३१००४ |
| २ | सेंद्रिय शेती प्रात्याक्षिक प्लॉट | ३७० | | १५५९०६० | ४३२.२ | ० | १६६३६५० |
| ३ | शेतीस तारकुंपण | १४४ | २६७५००० | २७३१००० | ५१ | ८५०००० | १६४२५०० |
| ४ | शेतकरी सहल, शेती दिन, अभ्यास दौरा,शेतकरी प्रशिक्षण | ३३६ | ८०००० | ४८३१५६ | २९ | ५७००० | २००००० |
| ५ | शेतकरी उत्पादक कंपनी नोंदणी, कार्य शाळा व प्रशिक्षण | ५ | ८००० | १०८००० | ० | ० | ० |
| ६ | माती परीक्षण | २०० | ३०००० | १००००० | २७३ | ० | ४०९५० |
| ७ | रेशीम उद्योग | १ | ० | ६१८१६० | ० | ० | ० |
| ८ | ताडपत्री व अवजारे वाटप | ४ | ० | ८५०००० | ० | ० | ० |
| ९ | सेंद्रिय खत निर्मिती | २० | ५०००० | ५०००० | ९ | ० | १०४५० |
| | उद्योजकता व उपजीविका | | | | | | |
| १ | छोट्या प्रकारचे उद्योग | १४ | ५१५००० | ११५००० | | | |
| २ | शेतीसाठी उपयुक्त अवजारे | ३० | ० | २४१८६०१ | ११ | ० | ३२५३९८१ |
| ३ | दुग्ध व्यवसाय व शेळी पालन | २५१ | १९५००० | १०२४५००० | ६३.५ | ० | ६९३२०४३ |
| ४ | कुक्कुट पालन | १७६ | ६०००० | ४८५००० | ० | ० | ० |
| ५ | शिलाई मशीन | ५४ | ४१४५०० | ४१४५०० | ४७ | १८०५०० | १७२५०० |
| ६ | गोडंबी उद्योग | ६ | ३८५००० | ३८५००० | ५ | ९९९२४ | १००००० |
| ७ | पशुधन उत्पाद्काला प्रशिक्षण | ६० | २०००० | ० | २ | २०००० | ० |
| ८ | बचत गट उदबोधन ,जाणीव जागृति , | ३१० | १८२००० | ५१००० | ५३ | ४४५०० | १३१८० |
| ९ | सायकल शिलाई मशीन वाटप | ३० | ० | ५२०००० | ० | ० | ० |
| १० | कौशल्य विकास प्रशिक्षण | २८० | ० | २५१०००० | १३ | २५००० | १७१८२३ |
| | स्वच्छता व सांडपाणी व्यवस्थापन | | | | | | |
| १ | सांडपाणी व कचरा व्यवस्थापन | १८ | १५५००० | १०१९०८१ | १० | ० | २२५५०० |
| २ | वैयक्तिक शौच्छालय | ३६६ | ० | ६१२२००० | ८० | ० | १०३६००० |
| ३ | शोष खड्डे | १५३ | २७५००० | ५६९००० | ४० | ० | ४६२०० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | कचरा कुण्डी पुरविने | ६० | ७०००० | ४४५००० | ५४ | ७०००० | २९०९५० |
| | आरोग्य | | | | | | |
| १ | आरोग्य शिबिर | १४ | ० | २५९७१५ | २ | ० | ४५००० |
| २ | आरोग्य विमा | ७६ | ० | ७८५०००० | १ | ० | ० |
| ३ | धुरळनी यंत्र | २ | ५५००० | ५५००० | १ | ० | १७००० |
| ४ | प्रथमोपचार पेटी, ब्लीचिंग पावडर,मेडीक्लोर पुरवठा करने | १७ | ० | १५१७०६ | ९ | ० | १४१८८६ |
| ५ | सेनेटरी पॅड वेंडिंग मशीन | १ | ८०००० | ० | ० | ० | ० |
| | शिक्षण | | | | | | |
| १ | शाळा व अंगनवाडी संगणकीकरन | १२ | ० | ५३७१०७ | ८ | | ४२६५०० |
| २ | शाळा व अंगनवाडी साठी साहित्य खरेदी | २४ | २४६५००० | २८७३६०७ | १३ | १००००० | २८८८९३७ |
| ३ | शाळा व अंगनवाडी बांधकाम व दुरुस्ती | ८ | ६५००० | ९८३९९४ | ७ | ६५००० | २७७६५६ |
| | जल संधारण | | | | | | |
| १ | सीमेंट नाला बांध बंधिस्थी,दुरुस्ती व खोलीकरन , रुंदी करन | 38 | ० | ११३७५००० | ३६ | ० | ८६१०००० |
| २ | ठीबक व तुषार सिंचन | ६४ | ० | १७८४००० | ६० | ० | १४९७६७२ |
| ३ | विहीर पुनर्भरण | १०२ | ० | ९७४००० | २४ | ० | ९४०००० |
| ४ | सिंचन विहीर | २२२ | ० | ३०९००००० | ९४ | ० | १६७३६५९६ |
| ५ | शेत तळे ,ढाळीचे बांध व सलग समतल चर | ४९० | १५०००० | ६८७७०३९ | १३९ | ० | ३५५०२९६ |
| ६ | इलेक्ट्रिक व सोलर मोटर पम्प | १६ | १३०००० | ३६५०००० | ९ | ० | १२६४६०० |
| ७ | उपसा सिंचन प्रकल्पाची कामे | २ | १०००००० | ७००००० | १ | ० | ७००००० |
| | सर्वांसाठी पक्की घरे | | | | | | |
| १ | घरकुल | १६६ | ० | ३४१८५००० | १३४ | ० | १२९१८०२४ |
| | मुलभुत पायाभूत सुविधा | | | | | | |
| १ | स्मशान भुमी,गोटरी शेड व सभामंडप बांधकाम व दुरुस्ती | १८ | १०२५००० | ७४३१२५० | १० | १७०००० | ४०६८२४२ |
| २ | हैण्ड पम्प बांधकाम व दुरुस्ती | ४ | ५०००० | ० | ३ | १००००० | २४९०० |
| ३ | ग्रामपंचायत दुरुस्ती व फर्नीचर खरेदी व इतर | १४ | ११०००० | ६७०८०९ | १२ | ० | २६२८०० |
| ४ | वैयक्तिक लाभाच्या योजना | २० | ० | ३७००००० | ५ | ० | ६०००० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | प्रकल्प फलक | २२ | ८८००० | | २२ | ८८००० | ० |
| ६ | सार्वजनिक ठिकाणी सीमेंट बाकडे बसविने | ५० | ४१०००० | ७००००० | २७ | १०५३४९ | ० |
| ७ | 4G केबल व जिओ टावर कनेक्टिविटी | २ | ० | १४००००० | १ | ० | ३००००० |
| | रस्ते | | | | | | |
| १ | गाव अंतर्गत सीमेंट रस्ते बांधकाम | २० | ० | १०१७५४५९ | १४ | ० | ७८२१५७२ |
| २ | दलित वस्तीत सीमेंट रस्ते बांधकाम | १२ | ० | २७४९४६२ | ५ | ० | २४६५००० |
| ३ | शेत रस्ते | १८ | ० | ३८७०००० | २ | ० | ४६००००० |
| ४ | स्मशानभुमी रस्ता बांधकाम | ६ | ० | ५००००० | १ | ० | ० |
| ५ | पेव्हर्स बसविने | ४ | ० | ४८५१९९ | ३ | ० | ५००००० |
| ६ | जोड रस्ता | ७ | ० | १०४३७२००० | ४ | ० | ५५४९९५०० |
| | पिण्याचे पाणी | | | | | | |
| १ | पिण्याचे पाणी व्यवस्था ,दुरुस्ती व खोलिकरण | १३ | ९९०२०० | ९०९७५०० | ७ | ० | ७२८७५० |
| २ | पिण्याच्या पाण्याचा स्त्रोताचा विकास करने | ८ | २००००० | ४९४३५९ | ४ | ७००००० | १२०००० |
| ३ | गाव पातळीवर पिण्याचे पाणी शुद्धिकरण यन्त्र बसविने | १२ | ३९०५००० | ९००००० | ७ | ६३४००० | २८५९३२ |
| ४ | पिण्याच्या पाण्याची वाढीव पाईप लाईन व दुरुस्ती | १० | ३६७५००० | ६२१०००० | ४ | १४१२२९० | ० |
| ५ | जनावरांसाठी पिण्याचे पाणी हौद बांधकाम | ७ | २२०००० | ८८०००० | ५ | ० | ४१६५०० |
| | पर्यावरण व जैव विविधता | | | | | | |
| १ | जैव विविधता समिति स्थापन करने | २० | ३२००० | | २ | ९००० | ० |
| २ | वृक्ष लागवड | १८ | ५०००० | १११०००० | १२ | ० | १७७१५० |
| ३ | घरगुती गैस सिलेंडर पुरवठा | ७२९ | | ७५७७५०० | ८२२ | ० | ५९५६२८४ |
| | विद्युत् | | | | | | |
| १ | रस्त्यावरील पथदिवे देखभाल दुरुस्ती | १६ | | १३८७५० | २७ | ० | १६९००० |
| २ | रस्त्यावरील पथदिवे बसविने | २५ | १३४०००० | ३००००० | ६५ | १२०२३०४ | ४३९१८८ |
| ३ | नविन विद्युत् जोडणी | १६ | १५०००० | १०४९००० | १८ | ० | ३०२००० |
| | | | **२१३०४७००** | **३०२९९८७६४** | | **५९३२८६७** | **१५९३४१७१६** |

संडे अँकर । ग्राम सामाजिक परिवर्तन प्रकल्पाची मिळाली मदत : २२ गावांतील ग्रामस्थांना मिळाला लाभ

# आदिवासी महिला बचत गटांनी उभारला उद्योग!

## विविध कामांसाठी विकास निधी

आजपर्यंत या प्रकल्पांतर्गत विद्यार्थ्यांना सायकल वाटप, महिलांना शिलाई मशीन वाटप, शेतकऱ्यांना जोडधंदा म्हणून दुधाळ जनावरे, शेळी गट वाटप, हळद उत्पादक शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान, भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान, महिला बचत गटांना उद्योग उभारणीसाठी अर्थसाहाय्य, ग्रामविकासाच्या विविध योजनांसाठी निधी देण्यात आला. आरोग्यासाठी ग्रामस्थांना शुद्ध पिण्याचे पाणी मिळावे, याकरिता १० आरओ प्लांट प्रस्तावित असून, ७ आरओ प्लांटची कामे प्रगतिपथावर आहेत.

बबन इंगळे ।
लोकमत न्यूज नेटवर्क

सायखेड : शेतकरी बचत गट यांचे आर्थिक जीवनमान वाढविण्यासाठी अर्थसाहाय्य (अनुदानित) ग्रामविकासाकरिता निधी देऊन सुधारणा करणाऱ्या ग्राम सामाजिक परिवर्तन प्रकल्प (व्हीएसटीएफ) महाराष्ट्रातील एक हजार गावांत पोहोचला आहे. हा प्रकल्प ६५ विविध संस्थांच्या माध्यमातून राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून बार्शीटाकळी तालुक्यातील आदिवासी महिला बचत गटांनी उद्योग उभारला असून, रोजगाराची संधी निर्माण केली आहे.

बार्शीटाकळी तालुक्यातील जाम वसू, चोहोगाव, टिटवा, जांभरूण, वाघा वस्तापूर, कोथळी बु., कोथळी खु., साखरविरा, देवदरी (वारखेड), धानोरा या दहा ग्रामपंचायतींमध्ये समाविष्ट २२ गावे या प्रकल्पामध्ये असून, ग्रामविकासासह शेतकऱ्यांना जोडधंदा, बचत गटांना स्वत:च्या रोजगार निर्मितीसाठी अनुदानित अर्थसाहाय्य देण्यात येते. यामध्ये जांभरूण येथील आदिवासी महिला बचत गटाने या प्रकल्पाचे माध्यमातून स्वत:चा गोळंबी उद्योग सुरु केला आहे. त्याची पाहणी करण्यासाठी २५ जुलै रोजी व्हीएसटीएफचे चीफ ऑपरेटिंग ऑफिसर धनंजय माळी यांनी जांभरूण येथे भेटीदरम्यान आढावा घेतला. कोथळी बु. येथील आरओ प्लांटचे उद्घाटन, जामवसू येथील कामांचीही पाहणी केली.

यातून उन्नतीच्या मार्गाने ग्रामपंचायती व शेतकरी, महिला बचत जात आहे. विशेष म्हणजे, रासायनिक खते, औषधे यामुळे दिवसेंदिवस शेतातील कमी होणारा सेंद्रिय कर्ब याची झीज भरून काढण्यासाठी या प्रकल्पांतर्गत शेतकऱ्यांना सेंद्रिय निविष्ठांचेसुद्धा वाटप मोफत करण्यात येते. विषमुक्त शेती करण्यासाठी शेतकऱ्यांनी कमी खर्चाच्या सेंद्रिय शेतीकडे वळावे, हा यामागील उद्देश आहे.



## महिलांना मिळाला रोजगार

दिवसभर बिबे फोडणाऱ्या आदिवासी महिलांना अल्प मजुरी मिळत होती. या मजुरीवर त्यांचा उदरनिर्वाह करणे कठीण होते. त्यातच हा रोजगारही हंगामी असल्याने इतर काळात त्यांना बेरोजगार राहावे लागत होते. या प्रकल्पाच्या माध्यमातून महिलांनी स्वत:चा उद्योग उभारला आहे. या उद्योगातून महिलांना रोजगार मिळाला आहे. तसेच स्वत:चा उद्योग असल्यामुळे या महिलांना चांगला नफाही मिळत आहे. शासनाच्या विविध योजनांचे अनुदान मिळत असल्याने महिलांचे राहणीमानही उंचावले आहे.

# पेपर प्रसिद्धी

मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी घेतला आढावा

# ग्राम सामाजिक परिवर्तन अभियानाला गती

लोकमत न्यूज नेटवर्क

अकोला: तीव्र दुष्काळ, दारिद्र्यता, शेती कर्ज, बेघर, स्वच्छता, उत्पन्नवाढीच्या समस्येसोबतच सामाजिक आव्हानांना तोंड देत असलेल्या जिल्ह्यातील बार्शीटाकळी तालुक्यातील २२ खेड्यांची निवड ग्राम सामाजिक परिवर्तन अभियानासाठी करण्यात आली आहे. जिल्हा अभियान परिषदेच्या आराखड्यानुसार अंमलबजावणीला गती देण्याचे निर्देश जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आयुष प्रसाद यांनी गुरुवारी बैठकीत दिले.

गेल्या काही वर्षांतील दुष्काळाने कृषी क्षेत्रातील उत्पादनात घट झाली. त्यामुळे ग्रामीण भागातील लोकांचे जीवनमान तणावग्रस्त झाले आहे. ग्रामीण भागातील दुष्काळावर मात करणे तसेच सामाजिकदृष्ट्या मागास खेड्यांच्या विकास करण्याचा प्रयत्न शासनाने खासगी कंपन्या, संस्थांच्या सहभागाने सुरु केला.

त्यामध्ये अकोला जिल्ह्यातील बार्शीटाकळी तालुक्यातील २२ गावांची निवड करण्यात आली. अभियान राबविण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा अभियान परिषदेची स्थापनाही करण्यात आली. परिषदेच्या बैठका पार पडल्या आहेत. त्यातून या २२ खेड्यांना आदर्श बनविण्यासाठी कृती आराखडाही तयार झाला. त्यानुसार डिसेंबर २०१८ अखेरपर्यंत गावांमध्ये आमूलाग्र बदल करण्याची तयारी झाली; मात्र निवड केलेल्या गावांमध्ये कामे सुरूच झाली नाहीत. त्याबाबतचा आढावा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी घेतला.

त्यामध्ये कृती आराखड्यातील सर्व कामाचे अंदाजपत्रक तयार आहे. कामाची निविदा प्रक्रिया आचारसंहिता संपताच सुरु होईल. त्यानंतर पुढील काम सुरु करण्याचे निर्देश त्यांनी दिले. मनरेगा अंतर्गत परिवर्तन अभियानाचे प्रत्येक गावात १० लाख रुपयांपर्यंत प्रस्तावित करून कामे तातडीने सुरु करण्याचे सांगितले. इतर विषयाचाही आढावा घेतला. सभेला जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विलास खिल्लारे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. संदीप भंडारे यांनी मार्गदर्शन केले. सभेला पंकज जंगले, सुरेश लुले, माधुरी सरोदे यांच्यासह ग्रामसेवक व ग्रामप्रवर्तक उपस्थित होते.

## परिवर्तन अभियानात निवड झालेली गावे

ग्राम सामाजिक परिवर्तन अभियानात बार्शीटाकळी तालुक्यातील २२ खेड्यांची निवड झाली आहे. त्यामध्ये १० ग्रामपंचायतीसह समाविष्ट असलेल्या खेड्यांचा समावेश आहे. जाम वसू अंतर्गत जामवसू, मांडोली, खडकी, चोहोगाव-सायखेड, धामणदरी, कोथळी बुद्रूक, कोथळी खुर्द, देवदरी-वरखेड, चिंचोली, साखरविरा-किन्हखेड, जांभरूण-हलदोली, टिटवन, वाघा-वस्तापूर, कासमार, धानोरा-फेट्रा, धोतरखेड ही गावे आहेत.

ग्रामस्थांशी साधला संवाद : विविध विकास कामांचा आढावा

# चोहोगाव येथे जि.प. 'सीईओं'ची भेट

लोकमत न्यूज नेटवर्क

सायखेड : चोहोगाव ग्रामपंचायत जेव्हापासून निर्माण झाली, तेव्हापासून पहिल्यांदाच अकोला जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी गावात आले व विविध विकास कामांचा आढावा घेऊन कामाची पाहणी केली.

१५ जानेवारी रोजी सीईओ कैलास पगारे यांनी चोहोगाव येथे आकस्मिक भेट दिली. त्यावेळी ग्राम सामाजिक परिवर्तन अभियानांतर्गत 'व्हीएसटीएफ' प्रकल्पातून राबविलेले उपक्रम, महिला बचत गटांना वाटप केलेले दुधाळ जनावरे, पूर्ण व अपूर्ण घरकुल बांधकाम, सिंचन विहिरी आदींसह विविध विकास कामांचा त्यांनी आढावा घेतला. चोहोगाव व



चर्चा करण्यात आली. गावाबाबत विविध समस्या ग्रामस्थांच्यावतीने ग्रामपंचायतने मांडल्या. अपूर्ण विकास कामे त्वरित मार्गी लावण्याचे निर्देश पं. स. प्रशासनाला सीईओ पगारे यांनी दिले. त्यावेळी ग्रा. पं. सरपंच

अधिकारी डी. एन. रुद्रकार, प्रकल्प व्यवस्थापक सुरेश लुले, कृषी समृद्धी प्रकल्पाच्या माधुरी सरोद, अकोला व वाशिम जिल्हा ग्रामसेवक युनियनचे माजी अध्यक्ष अशोक कोहर, ग्रामसेवक महेंद्र बोचरे, ग्राम प्रवर्तक

# ग्राम परिवर्तन अभियानात आता वन विभागाच्या कामांचा समावेश

लोकमत न्यूज नेटवर्क

**अकोला:** तीव्र दुष्काळ, दारिद्र्यता, शेती कर्ज, बेघर, स्वच्छता व उत्पन्न वाढीच्या समस्येसोबतच सामाजिक आव्हानांना तोंड देत असलेल्या खेड्यांमध्ये ग्राम सामाजिक परिवर्तन अभियानांतर्गत आता वन विभागाच्या वैयक्तिक लाभाच्या योजनांचा समावेश करण्यात आला आहे. ५० कोटी वृक्ष लागवडीतून राज्यातील वनक्षेत्र ३३ टक्क्यांपर्यंत वाढविण्यासाठीच्या उपाययोजना त्यातून राबविल्या जाणार आहेत.

गेल्या काही वर्षांतील दुष्काळाने

## वन विभागाच्या वैयक्तिक लाभाच्या योजना

- प्रत्येक ग्रामपंचायतमध्ये १० हजार झाडांची लागवड, संगोपन करणे, लहान आणि सीमांतक शेतकऱ्यांसाठी कृषी वानिकी योजना, जलयुक्त शिवार, मृद व जलसंधारणाची कामे, आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र हरित सेनेमध्ये नोंदणी, आदिवासी मुला-मुलींना कौशल्य विकास आणि उपजीविकेचे प्रशिक्षण, नदी किनारी वृक्ष लागवड, कन्या वन समृद्धी योजना, रानमाळा गावाच्या धर्तीवर वृक्ष लागवडीची योजना राबविल्या जाणार आहेत.

## प्रकल्प अंमलबजावणी युवा संस्थेकडे

- गावांमध्ये विविध प्रकल्प राबविण्यासाठी युवा संस्थेची

## अकोला जिल्ह्यातील निवड झालेली गावे

- अकोला जिल्ह्यातील बार्शीटाकळी तालुक्यातील २२

---



# हळद लागवडीतून शेतकऱ्यांना दुप्पट उत्पन्न

'कृषी समृद्धी योजनेचा' शेतकऱ्यांना लाभ, महाराष्ट्र ग्राम सामाजिक अभियानाअंतर्गत केली लागवड

प्रतिनिधी । अकोला

महाराष्ट्र ग्राम सामाजिक अभियान अंतर्गत अकोला जिल्ह्यातील निवडक गावांमधील ६५ शेतकऱ्यांनी हळद लागवड योजनेत सहभाग नोंदविला असून हळदी या पिकामधून शेतकऱ्यांना चांगले उत्पादन मिळाले आहे.

मुख्यमंत्री ग्रामपरिवर्तक योजनेअंतर्गत अकोला जिल्ह्यातील चोहोगाव, सायखेड, धामणदरी, देवदरी, चिंचोली, वरखेड, किनखेड, वस्तापूर व कोठाळी या गावातील हळद लागवडीचा उपक्रम राबविण्यात आला होता. कृषी समृद्धी योजने अंतर्गत शेतकऱ्यांना हळद लागवडीसाठी निधी देण्यात आला. यासाठी युवा संस्थेचे कल्प समन्वयक सुरेश लुले यांनी शेतकऱ्यांकडून योग्य ती कागदपत्रे



महाराष्ट्र ग्राम सामाजिक अभियाना अंतर्गत जिल्ह्यातील निवडक शेतकऱ्यांनी हळदीची लागवड केली.

एक दिवसीय प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये त्यांना हळद लागवड, पिकांचे व्यवस्थापन, औषध

१०० एकरांमध्ये हळदीचे पीक घेतले. १ एकराला जवळपास १०० क्विंटल ओली हळद मिळाली. त्यामुळे १००

ही हळद सुकल्यानंतर २०० क्विंटल बनले. त्यामुळे शेतकऱ्यांना १०० एकरात सरासरी २००० क्विंटल हळदीचे उत्पादन मिळाले. या हळदी उत्पादनाला सहा हजार ते साडे सहा हजार प्रति क्विंटल भाव मिळाल्याने शेतकऱ्यांना चांगले उत्पन्न मिळाले.

हळदीच्या पिकाची लागवड करण्याची योजना व्हीएसटीएफच्या गावातील ६५ शेतकऱ्यांनी राबविली. पिकाच्या पूर्ण प्रक्रियेसाठी आठ महिन्यांचा कालावधी लागला. यातून एकूण खर्च शेतकऱ्यांना ५० ते ६० हजार रुपये आला. त्यातून त्यांना प्रत्येकी एक लाख वीस हजार रुपये उत्पन्न मिळाले असून जवळपास प्रति एकर मागे ७० हजार रुपये नफा शेतकऱ्यांना मिळाला आहे. ही योजना राबविण्यासाठी ग्राम प्रवर्तक रमेश राठोड, प्रशांत ताठे, सुमित अढाळे, ज्ञानदेव मनवर,

---

# ग्राम परिवर्तन अभियानामुळे शेतकरी गटांची समृद्धी

## पालकमंत्री डॉ. रणजित पाटील यांच्या हस्ते अनुदानाचा धनादेश वितरित

लोकमत न्यूज नेटवर्क

**अकोला :** कृषी समृद्धी व ग्राम सामाजिक परिवर्तन अभियानांतर्गत वाघा वस्तापूर येथील शेतकरी बचत गटांनी युवा संस्थेच्या माध्यमातून शेतीस जोडधंदा म्हणून ट्रॅक्टरचलित अवजारांची बँक तयार केली. त्यामुळे शेतकरी गटाच्या आर्थिक उत्पन्नात भर पडून समृद्धी आलेली आहे. वाघा वस्तापूर येथील गुप्तेश्वर महाराज बचत गटाला युवा संस्थेच्या माध्यमातून २ लाख ९१ हजार २०० रुपये किंमत असलेले बहू उपयोगी मळणी यंत्र खरेदी करण्यात आले आहे. यामध्ये प्रकल्पांतर्गत या गटाला मळणी यंत्र खरेदीसाठी १ लाख १६ हजार ४८० रुपयांचे अनुदान देण्यात आले. वस्तापूर येथील जय बळीराजा शेतकरी बचत गटाला पेरणी यंत्र, रोटाव्हेटर व हायड्रॉलिक पलटी नांगर इत्यादी अवजारे २ लाख ३२ हजार किमतीची खरेदी करण्यात आली. यामध्ये प्रकल्पांतर्गत या गटाला ९२ हजार ८०० रुपयांचे अनुदान देण्यात आले.

सदर अनुदानाचा धनादेश पालकमंत्री डॉ. रणजित पाटील यांच्या हस्ते जिल्हाधिकारी यांच्या दालनात वितरित करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी आस्तिककुमार पाण्डेय, पोलीस अधीक्षक एम. राकेश कलासागर, उपजिल्हाधिकारी रोहयो अशोक अमानकर, कृषी समृद्धी प्रकल्पांचे जिल्हा प्रकल्प व्यवस्थापक माधुरी सरोदे, ग्राम सामाजिक परिवर्तन अभियान प्रकल्पाचे व्यवस्थापक सुरेश लुले, कृषी तज्ज्ञ अनिल लोणारे, निकेष वानखडे, लेखापाल राकेश वाघ व राम तांबड यांची प्रमुख उपस्थिती होती.

गुप्तेश्वर महाराज बचत गट व जय बळीराजा शेतकरी बचत गटांनी शेतीस जोडधंदा म्हणून ट्रॅक्टरचलित अवजारांची बँक तयार केली आहे. त्या माध्यमातून इतर शेतकऱ्यांना अवजारे भाड्याने देतात. यामुळे त्यांना प्रतिमहिना आठ हजार रुपयांपर्यंत निव्वळ नफा मिळत आहे. यामुळे त्या बचत गटाच्या उत्पन्नात वाढ झाली आहे.

ग्राम सामाजिक परिवर्तन अभियान प्रकल्पांतर्गत बार्शीटाकळी तालुक्यातील २२ गावे प्रायोगिक तत्त्वांवर सहभागी झाली आहेत. युवा संस्था अकोलाच्या माध्यमातून सदर प्रकल्प या गावात राबविण्यात येत आहे.

शेतीला पूरक व्यवसाय, सेंद्रिय शेती, भाजीपाला पिकांची लागवड, मसाला पिकांचे उत्पादन, जोडधंदा निर्मिती, दुग्ध व्यवसाय, शेळीपालन, ट्रॅक्टरचलित अवजारे, दालमिल, पाणलोट विकासाची कामे, गावांमध्ये मूलभूत सोयी-सुविधा निर्माण करणे, स्वच्छ पिण्याचे पाणी तसेच वॉटर फिल्टर बसविणे यासारखी कामे या संस्थेद्वारे राबविण्यात येत आहेत.

---

# गावाच्या विकासासाठी 'ग्राम सामाजिक परिवर्तन अभियान' महत्त्वाकांक्षी प्रकल्प!

## अपर जिल्हाधिकारी खवले : ग्राम सामाजिक परिवर्तन आढावा सभेची सांगता

लोकमत न्यूज नेटवर्क

**अकोला :** गावाचा कायापालट व सर्वांगीण विकासासाठी शासनाने राज्यातील खासगी, सार्वजनिक कंपन्या तसेच वित्तीय संस्था यांच्या माध्यमातून ग्राम सामाजिक परिवर्तन अभियान (व्हीएसटीएफ) हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबविण्यात येत आहे. गावांच्या विकासासाठी हा प्रकल्प महत्त्वाचा असल्याचे प्रतिपादन अपर जिल्हाधिकारी राजेश खवले यांनी बुधवारी केले. या अभियानाची आढावा बैठक जिल्हाधिकारी

## जिल्ह्यातील २२ गावांचा समावेश

- बार्शीटाकळी तालुक्यातील १० ग्रामपंचायतींमधील २२ गावांचा समावेश यावर्षी ग्राम सामाजिक परिवर्तन अभियानात करण्यात आलेला आहे. जामवसू, मांडोली, खडकी, चोहोगाव, सायखेड, धामणदरी, कोथळी बु., कोथळी खु., देवदरी, वरखेड, चिंचोली, साखरविरा, किंगखेड, जामरुण, हलदोली, टिटवन, वाघा, वस्तापूर, कासमार, धानोरा, फेटरा व धोतरखेड या गावांचा समावेश आहे. या गावात ग्राम सामाजिक परिवर्तन अभियान, कृषि समृद्धी प्रकल्प, जलयुक्त शिवार, १४ व्या वित्तीय आयोगाची कामे व इतर विभागाची कामे करण्यात येणार आहेत.

योजनेचे नोडल अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत श्रीराम कुळकर्णी, बार्शीटाकळीचे

कंपन्या तसेच वित्तीय संस्था यांच्या सामाजिक दायित्वाच्या माध्यमातून राज्यातील हजार गावांमध्ये परिवर्तन

# प्रकल्पा बाबत

व्हिलेज सोशल ट्रान्सफोर्मेशन मिशन ही महाराष्ट्र सरकार आणि भारत सरकारच्या अग्रगण्य कॉर्पोरेट्स आणि परोपकारी संस्था यांच्यात विकासातील अंतर दूर करण्यासाठी आणि ग्रामीण महाराष्ट्रात मोठे सामाजिक भांडवल स्थापन करण्यासाठी अग्रगण्य सार्वजनिक-खाजगी भागीदारी आहे. युवा या प्रकल्पाची अंमलबजावणी करणारा भागीदार आहे.

प्रकल्पाचे मुख्य उद्देश्य गरिबीचे उन्मूलन आणि उत्पन्न निर्मिती आहे, त्यासाठी महाराष्ट्रातील अकोला तालुक्यातील १० ग्राम पंचायतीतील ग्रामीण परिवारांना शाश्वत उपजीविका मिळविण्यास सक्षम करणे, गावांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी गावातील शिक्षण आणि आरोग्य सुविधांचा दर्जा सुधारणे तसेच गावातील लोकांना मूलभूत सुविधांचा लाभ घेण्यासाठी सक्षम करणे आहे.